संस्थापक - नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

रोखठोक बेधडक

संपादकीय......

।। न मे भक्त : प्रणश्यति ।।

# राष्ट्रवादीचे चिंतन शिबिर नव्हे चिंता शिबिर

राष्ट्रवादी काँग्रेसला पहिल्यांदाच चिंतन शिबिर घेण्याची उपरती झाली. लोकसभा निवडणुकीपाठोपाठ विधानसभा निवडणुकीतही राष्ट्रवादी काँग्रेसला पराभव पत्करावा लागला. गेली १५ वर्षे सत्तेत राहण्याची सवय असलेल्या शरद पवारांना आणि त्यांच्या नेत्यांना हा पराभव पचविणे जड जात आहे. हा पराभव कशामुळे झाला याचा विचार करण्याकरिता 'अलिबागला राष्ट्रवादीचे अलिबाबा' आणि त्यांचे ४० आमदार जातीने हजर होते. पराभवाबरोबरच शरद पवारांना एका वेगळ्या गोष्टींने ग्रासले आहे. त्यांनी अलिबागच्या या शिबिराला चिंतन शिबिर असे म्हटले असले, तरी ते खरे तर चिंता शिबिरच होते. कारण सत्ता तर अशी तशी गेलीच आहे. परंतु आता राष्ट्रवादीच्या तिकिटावर निवडून आलेले आपल्याच शिबिरात राष्ट्रवादीचा किल्ला सोडून केव्हा पसार होतील याचा त्यांना भरोसा वाटत नाही. म्हणून विधानसभा निवडणुकीचे निकाल ज्या दिवशी लागले, त्याच दिवशी शरद पवारांनी भारतीय जनता पार्टीला बिनशर्त पाठिंबा जाहीर केला. त्यांच्या या विधानामुळे राष्ट्रवादीचे अनेक शिलेदार गोंधळात पडले. तर अनेकांनी सुटकेचा नि:श्‍वास टाकला. कारण त्यांचे काही मित्र यापूर्वीच भाजपाच्या तंबूत जाऊन पोहोचले आहेत. आता पवार साहेबांनीच भाजपाचे वर्चस्व मान्य केले. म्हणजेच आपल्यालादेखील संधी मिळताच भाजपात डेरेदाखल व्हायला हरकत नाही. फक्त हे शिलेदार योग्य वेळेची वाट पहात आहेत. पवार साहेबांना आपल्या पक्षाच्या तंबूमध्ये काय हालचाली सुरू आहेत याची खबरबात लागल्याने ते अधिक होशियार झाले आहेत. दगाफटका त्याचवेळी होऊ नये म्हणून अलिबागच्या किल्ल्यात आपल्या चिंतेला सार्वजनिक केले.

## राजकीय इतिहासातले नवे प्रकार

महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात काही प्रकार पहिल्यांदाच घडत आहेत. एक तर प्रथमच कोणत्यातरी एकाच पक्षाला १२०पेक्षा जागा मिळाल्या. आता तरी काँग्रेसलाच एवढ्या जागा मिळत असत. दुसरा प्रकार म्हणजे बहुमत नसताना विश्‍वासदर्शक ठराव आवाजी मतदानाने मंजूर करून घेतला गेला. तिसरी गोष्ट अशी की, अल्प मतातल्या या सरकारला पाठिंबा देण्यासाठी एक नव्हे तर दोन दोन पक्ष उत्सुक असताना सत्ताधारी पक्षाने तो पाठिंबा मिळविण्याची कोणतीही घाई केलेली नाही. पाठिंबा मिळत असूनही तो स्वीकारलेला नाही आणि नाकारलेलाही नाही, असे महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात पहिल्यांदाच घडत आहे. एवढेच नव्हे तर ज्याला राजकीय अधांतरीपणा म्हणता येईल तोदेखील पहायला मिळतो आहे. आपण दिलेला पाठिंबा भाजपा स्वीकारत नाही आणि नाकारतही नाही, या भूमिकेमुळे एकाच वेळी राष्ट्रवादी आणि शिवसेना या दोन्ही पक्षांना संभ्रमात राहण्याची वेळ पहिल्यांदाच आलेली आहे. ही अस्वस्थता पवार लपवू शकत नाहीत आणि म्हणून त्यांनी गेल्या काही दिवसांत उलटसुलट विधाने करून त्याचे प्रदर्शन केले आहे. महाराष्ट्राच्या हितासाठी आम्ही कोणतेही सरकार पाडणार नाही, असा नवा षटकार ठोकून पवार यांच्या मनात चिंतेचे चिंतन सुरू आहे हे स्पष्ट होते. आतापर्यंत सतत सत्तेत राहणाऱ्या पवारांना कधीही कशाचीही चिंता करण्याची वेळ आली नाही आणि चिंतन करण्याची कधी गरजही पडली नाही.

## पक्षांतरासाठी नागपूर प्रसिध्द

राज्यातील ही राजकीय परिस्थिती बघितली तर भाजपा पाठिंबा मिळत असूनही तो घेण्याची घाई का करत नाही किंवा शिवसेनेला बरोबर घेऊन आपले सरकार स्थिरस्थावर का करीत नाही, असा प्रश्‍न सहज निर्माण होतो. भाजपाचा निश्चिंतपणा पवारांच्या चिंतेशी आणि चिंतनाशी जोडलेला आहे. कारण पवारांच्या टिममधले ५० पेक्षा अधिक खेळाडू आधीच भाजपाकडे दाखल झाले आहेत. आणि आणखीन २५ खेळाडू येण्याच्या मार्गावर आहेत अशी खात्री भाजपाला वाटते. याकरिता भाजपा नागपूरच्या प्रसिध्द हिवाळी अधिवेशनाची वाट पाहत आहेत. पक्षांतरासाठी नागपूरचे हिवाळी अधिवेशन प्रसिध्द मानले जाते. यापूर्वी २-३ वेळा मोठी पक्षांतरे नागपूर अधिवेशनात पार पडली आणि सत्तांतरे घडवून आली यावेळीसुध्दा असे घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. भाजपाचे वरिष्ठ नेते डिसेंबरची वाट पाहत आहे. कदाचित पवारांच्या १२ डिसेंबरच्या वाढदिवसापूर्वीच भाजपा वेगळा बार उडवू शकतो. नाही तरी नागपूरचे अधिवेशन अशाच कारणांमुळे गाजत असते आता तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या गावातच अधिवेशन होत आहे आणि आपलीच सत्ता मजबूत करण्याकरीता ते या विदर्भातल्या हिवाळी अधिवेशनाला वादळी ठरवू शकतात आणि डिसेंबरचा राजकीय धमाका उडवण्याची तयारी सुरू केली असावी; म्हणूनच दोन दोन पक्ष पाठिंबा देण्यासाठी तयार असताना भाजपा तो का घेत नाही आणि त्यासाठी घाई का करत नाही हे सहजपणे लक्षात येते. सत्तेचा डाव खेळताना कोणत्या सोंगट्या केव्हा फेकायच्या आणि केव्हा उचलायच्या, याचेही गणित ठरलेले असते. सध्या भाजपाने सत्तेचा डाव तर मांडलेला आहे. योग्य खेळीची ते वाट पहात आहेत. खेळाडूंची संख्या बरीच असल्यामुळे कोणापासून आणि कशी सुरुवात करायची, असाही भाजपापुढे प्रश्‍न आहे. शरद पवारांनी सरकार टिकणार नाही असे कितीही सांगितले असले तरीसुध्दा हे सरकार टिकणे किंवा टिकवणे हे सर्वस्वी भाजपावर अवलंबून राहणार आहे. थोडी जरी खेळी चुकली तरीसुध्दा डाव उलटू शकतो आणि भाजपाला सरकार गमवावे लागू शकते. त्यामुळे कोणालाही पाडापाडी करायला संधी मिळण्याची शक्यता नाही. केंद्रात बहुमतातले सरकार आहे. अजूनही जनमत मोदींच्या बाजूने आहे. किमान येती पाच वर्षे तरी मोथदी आपला पाया भक्कम करतील. अशा परिस्थितीत राज्यातले सरकार पाडण्याचा उद्योग जो कोणी करेल तो त्यांच्याच अंगाशी येऊ शकतो, हे शरद पवारांना चांगले माहीत असल्यामुळे त्यांनी लागलीच दुसऱ्या दिवशी खुलासा करून पाडापाडीमध्ये आम्हाला रस नसल्याचे स्पष्ट केले आहे.